ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग,
अर्थशास्त्र, व्यापार,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
प्रमुख मराठी
वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या
पहिल्या व तिसऱ्या
बुधवारीं
प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २७ | पुणें, बुधवार तारीख ५ जुलै, १९६१ | अंक १३

## विविध माहिती

**उंबरगांवजवळ औद्योगिक वसाहत**—दक्षिण गुजरातमध्यें उंबरगांवजवळ एक मोठी औद्योगिक वसाहत स्थापन करण्यांत येणार आहे. औद्योगिक वसाहतीसाठी ६०० ते ८०० एकर जागा लागेल व तींत निरनिराळ्या प्रकारचे उद्योगधंदे काढण्यांत येतील. उद्योगधंद्यांना लागणाऱ्या विजेचा पुरवठा तारापूर येथें उभारण्यांत यावयाच्या अणुवीज केंद्रांतून करण्यांत येईल. तारापूरचें केंद्र महाराष्ट्रांत आहे.

**दुर्गापूर येथें रासायनिक कारखाना**—दुर्गापूर येथें एक रासायनिक कारखाना काढण्याचा विचार पश्चिम बंगालचें सरकार करीत आहे. कारखाना काढण्याच्या कामीं फ्रेंच कंपनीचें साह्य घेण्यांत येणार आहे. दुर्गापूर येथील पोलादाच्या कारखान्यासाठी वापरण्यांत येणाऱ्या कोळशापासून मिळणाऱ्या उपपदार्थांचा कारखान्यासाठी उपयोग करण्यांत येणार आहे.

**कोंकणांतील वादळामुळें नुकसान**—दक्षिण कोंकणांत २४ मे रोजीं झालेल्या प्रचंड वादळामुळें सुमारें १ कोटी रुपयांचें नुकसान झालें असावें असा अंदाज करण्यांत आला आहे. सावंतवाडी, वेंगुर्ला, मालवण व कुडाळ ह्या चार तालुक्यांतून १,७३२ घरें पडलीं व २४,५४४ घरें नादुरुस्त झालीं. सुमारें १ लाख नारळीचीं झाडें उन्मळून पडलीं. त्याशिवाय सुपारीचीं ६७,८०० व आंब्यांचीं ४४,११२ झाडें जमीनदोस्त झालीं.

**काश्मीरमध्यें सुताची गिरणी**—काश्मीर राज्यांत सुताची गिरणी काढण्याबद्दल काश्मीरचें सरकार खाजगी उद्योगपतींना आवाहन करीत आहे. संकल्पित गिरणीमध्यें १२,००० चात्या असतील व त्यानंतर २५,००० पर्यंत वाढविण्यांत येणार आहेत. गिरणींत तयार होणारें सूत हातमाग व यंत्रमाग ह्यांच्यासाठीं राखून ठेवण्यांत येईल.

**कलकत्ता बंदरासाठी कर्ज**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कलकत्ता बंदराचा विकास करण्यासाठी जागतिक बँकेकडून २ कोटी डॉलर्स कर्ज मिळण्याचा संभव आहे. बँकेचे प्रतिनिधि आणि भारत सरकारच्या दळणवळण व वाहातूक खात्याचे प्रतिनिधि ह्यांच्यांतील ह्याविषयक वाटाघाटी आतां पूर्ण होत आल्या आहेत.

**कानपूर येथील विमानाचा कारखाना**—भारताच्या संरक्षणखात्यातर्फे कानपूर येथें काढण्यांत येणाऱ्या वाहातुकीच्या विमानाच्या कारखान्याच्या उभारणीचें काम जोरांत सुरू आहे. हा कारखाना ठरलेल्या वेळेपेक्षा लवकरच पूर्ण होईल आणि येत्या ऑगस्ट महिन्यांत त्यांत पहिलें विमान तयार होईल असा अंदाज आहे.

**आंतरराष्ट्रीय जीवनाची तोंडओळख**—अमेरिकेंतील ३५ तरुण-तरुणी न्यूयॉर्कहून मुंबईला आले आहेत. आंतरराष्ट्रीय जीवनाची ओळख करून घेण्यासाठी ते भारताचा ७ आठवड्यांचा दौरा काढणार आहेत. आपल्या दौऱ्याच्या काळांत हे अमेरिकन तरुण भारतामधील कुटुंबांतच वास्तव्य करणार आहेत. एक्सपेरिमेंट इन् इंटरनॅशनल लिव्हिंग ह्या संघटनेतर्फे हे प्रवासी आले आहेत. ह्या संघटनेच्या शाखा ३० देशांत आहेत.

**रेल्वे रस्त्याकडेची शेतजमीन**—रेल्वे-मार्ग आणि रस्ते ह्यांच्या कडेला असलेली पडीक जमीन लागवडीला आणण्याच्या एका योजनेचा विचार गुजरात राज्यसरकारचें शेतकीखातें करीत आहे. ही जमीन सुपीक असून ती लागवडीखालीं आणण्यास फारसा खर्च येणार नाहीं. जपान व इतर कांहीं देश ह्यामधून रेल्वेमार्गाच्या व रस्त्याच्या कडेला असलेली जमीन यशस्वी रीत्या उपयोगांत आणली गेली आहे

**छोट्या मोटारींचा कारखाना**—भारतांत छोट्या मोटारींचें उत्पादन करण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें एक कमिटी नेमली होती. हा कारखाना कोठें निघणार तें अद्याप ठरलेलें नाहीं. परंतु हा कारखाना हुबळी व धारवाडच्या दरम्यान काढण्यांत यावा, अशी मागणी म्हैसूरचें सरकार करणार आहे.

**पुस्तकांचें आंतरराष्ट्रीय प्रदर्शन**—पश्चिम जर्मनींतील फ्रँकफर्ट येथें पुस्तकांचें वार्षिक आंतरराष्ट्रीय प्रदर्शन ऑक्टोबरमध्यें भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनांत जगांतील २,००० प्रमुख प्रकाशक भाग घेणार आहेत. जर्मनीच्या प्रकाशकांनीं शांततेच्या प्रयत्नासाठी जें बक्षीस ठेवलें आहे तें प्रदर्शनाच्या वेळीं भारताचे उपाध्यक्ष डॉ. राधाकृष्णन् ह्यांना देण्यांत येईल.

**स्टेट बँकेच्या शाखा** १९५५ च्या जुलै महिन्यांत स्टेट बँक अस्तित्वांत आली. तेव्हांपासून ५ वर्षांच्या काळांत ४०० शाखा काढण्याचें उद्दिष्ट ठेवण्यांत आलें होतें. १९६० अखेर बँकेनें एकूण ४२९ शाखा स्थापन केल्या. त्यपैकीं ३५२ शाखा ग्रामीण अगर अर्धग्रामीण भागांतील आहेत. अजून १,४०० मध्यम प्रतीच्या गांवांना कोणत्याच बँकेची सोय नाहीं.

**कॅन्सरवरील औषध सांपडलें !**—सामान्यपणें असाध्य समजल्या गेलेल्या कॅन्सरच्या रोगावर रासायनिक औषध सांपडल्याचा दावा एका अमेरिकन डॉक्टरनें केला आहे. कॅन्सर झालेल्या रोग्यांना हें औषध दिलें असतां ५० टक्के रोगी बरे झाले असें त्याचें म्हणणें आहे. त्यांतल्या त्यांत स्त्रियांना गर्भाशयांत होणाऱ्या कॅन्सरवर तें विशेष गुणकारी ठरलें आहे.

## इनकम टॅक्स देणारे व्यावसायिक लोक : तुलनात्मक आंकडे

वेगवेगळ्या व्यवसायांतले किती लोक किती प्राप्तीवर किती इन्कमटॅक्स देतात, ह्याचे आंकडे खाली दिले आहेत. डॉक्टर आणि वकील ह्यांची कर भरणारांत सर्वांत जास्त संख्या आहे; साहित्यिक आणि शिक्षक सर्वांत खाली आहेत.

| व्यवसायाची वर्गवारी | कर भरणारांची संख्या | उत्पन्न (रु. ०००) | इनकमटॅक्स (रु. ०००) | सुपरटॅक्स (रु. ०००) | सरचार्ज (रु. ०००) |
|---|---|---|---|---|---|
| शिक्षणखातें व शिक्षक | १,१४६ | ७५,७८ | ५,१९ | २,४२ | ३५ |
| साहित्य, वृत्त-व्यवसाय | ९९९ | ८५,३९ | ८,८८ | ९,६२ | ५१ |
| डॉक्टर | १७,३७५ | ११,३९,६३ | ७०,४५ | २२,६५ | ५,९४ |
| चित्रपटनिर्मिति | १,८२९ | ४,८४,६९ | ७४,४९ | ८४,०९ | ५,०७ |
| संगीत, नाट्य | १,२७७ | २,२०,६५ | ३२,५६ | ३०,३० | २,८९ |
| वकील | ११,०६० | ८,९३,०२ | ६०,८६ | ३०,१६ | ६,१९ |
| आर्किटेक्ट, इंजिनिअर्स | ५२९ | १,८१,४२ | २९,५२ | ३३,१९ | १,८८ |
| अकौंटंटस्, ऑडिटर्स, ॲक्चुअरी | ८०३ | १,५४,६४ | ११,५२ | ३,०० | ७७ |
| इतर | ३१८ | ६५,०७ | ५,३९ | ५,५५ | ६० |
| एकूण | ३५,३४६ | ३३,००,२९ | २,९८,८६ | २,२०,९८ | २४,२० |


THE DECCAN INSTITUTE OF COMMERCE.

*717, Budhwar Peth, Poona 2.* *Phone No. 2360*

**BANKERS PRACTICAL TRAINING COURSE.**

Admission to Bank employees and Persons desirous of taking up Banking Career.

Duration—3 months. Time—7 to 8 p.m. Fees—Rs. 50 only. Limited Admission.

Date of Commencement :— 1st July, 1961.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

रजिस्टर्ड ऑफिस : ११७७, बुधवार पेठ, पुणें शहर

—: भांडवल :—

वसूल भांडवल ... ... रु. ३६,००,००० चे वर

गंगाजळी व इतर निधि ... रु. १७,१०,००० 

खेळतें भांडवल ... रु. १६ कोटींचे वर

★ महाराष्ट्र, आंध्र, म्हैसूर आणि मध्यप्रांतांत मिळून बँकेच्या ६६ शाखा

★ सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

★ स्टर्लिंग व डॉलर करन्सीमधील प्रवासी चेक्स विकत मिळतात

★ परदेशी लेटर्स ऑफ क्रेडिट उघडलीं जातात

— १९ जून, १९६१ पासून सुरु झालेल्या ५ नव्या शाखा —

सावंतवाडी, मालवण, कुडाळ, बांदा व फोंडा

—१ जुलै, १९६१ पासून सुरु झालेल्या ७ नव्या शाखा—

लक्ष्मीरोड, पुणें २, कँप, पुणें १, लोणावळा, खोपोली, बारामती, श्रीरामपूर, ओझर (ताम्बट)

जनरल मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. ५ जुलै, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकांची मजबुती वाढविण्यासाठी कायद्यांत सुधारणा

### वसूल भांडवल, गंगाजळी, तरते फंड्स, कॅश रिझर्व्हज् इत्यादींत सुधारणा

बँकांचें वसूल भांडवल आणि गंगाजळी ह्यांचें ठेवींशीं पडणारें प्रमाण उतरत चाललें आहे. ही परिस्थिति सुधारण्यासाठी, हें प्रमाण वाढविण्याचें रिझर्व्ह बँकेनें ठरविलें आहे. इतर देशांतील कायद्यांच्या तरतुदी, त्याचप्रमाणें शास्त्री ट्रायब्यूनल, बँक अवार्ड कमिशन आणि त्रावणकोर-कोचीन बँकिंग इन्क्वायरी कमिशन ह्यांच्या सूचना लक्षांत घेऊन, बँकिंग कंपन्यांच्या कायद्याचें १७ (१) हें कलम दुरुस्त केलें जाणार आहे. (अ) गंगाजळीची रक्कम वसूल भांडवलाइतकी होईपर्यंत, आणि (ब) वसूल भांडवल व गंगाजळी ह्यांची रक्कम ठेवींच्या ७½% होईपर्यंत, प्रत्येक बँकेनें आपल्या निव्वळ नफ्याच्या किमान २०% रक्कम गंगाजळींत टाकली पाहिजे, अशी त्यामुळें सुधारणा होईल. करापूर्वीच्या नफ्याला निव्वळ नफा म्हटलें जाईल.

सध्या ५०,००० रुपयांच्या भांडवलावर बँक काढतां येते; ह्यापुढें किमान ५ लक्ष रुपयांचें भांडवल आवश्यक होईल. बँकेची कचेरी मुंबई किंवा कलकत्ता येथें हवी असल्यास किमान २० लक्ष रुपयांचें भांडवल प्रारंभींच असावें लागेल. चालू असलेल्या बँकांपैकीं ज्यांचें भांडवली फंड्सचें ठेवींशीं प्रमाण अत्यल्प (३% पेक्षा कमी) असेल, त्यांना किमान ७½% ची मर्यादा गाठायला दीर्घ अवधि लागेल; कितीतरी वर्षें लोटावीं लागतील. रिझर्व्ह बँक अशा बँकांना सक्तीनें वसूल भांडवल वाढवायला लावील. कॉल्स करून न मागणी केलेल्या भांडवलाची मागणी करणें सोपें आहे, तसें नवीन भांडवल विकणें सोपें नाहीं. म्हणून, नवें भांडवल विक्रीस काढायला सांगण्यापूर्वीं रिझर्व्ह बँक सर्व परिस्थितीचा अर्थातच विचार करील.

गेल्या दहा वर्षांत, बँकांच्या लिक्विडिटीचें प्रमाण (कॅश, रिझर्व्ह बँकेंतील शिलक, सोनें, तारणांत न अडकलेले सरकारी रोखे, ह्यांचें एकूण ठेवींशीं प्रमाण) ४३·३% वरून ३३·१% वर उतरलें आहे. शेड्यूल्ड बँकांच्या कॅशचें ठेवींशीं प्रमाण ११·१% वरून ७·५% वर आलें आहे. येत्या कांहीं वर्षांतील औद्योगीकरणाच्या प्रगतीमुळें बँकांचीं कर्जें आणखी वाढतील; ठेवींच्या वाढीपेक्षा कर्जांची वाढ अधिक होईल. त्याचा बँकांच्या लिक्विडिटीवर आणखी परिणाम होईल. ही लिक्विडिटी कायम राखण्यासाठी कॅश रिझर्व्ह आणि तरती जिंदगी ह्यांची किमान पातळी वाढविणें आवश्यक झालें आहे; त्यांचें ठेवींशीं किमान प्रमाण जोडून देणें अपरिहार्य झालें आहे. आवश्यक रिझर्व्हज्चा हिशेब करतांना सध्यां चालू आणि मुदती ठेवींचा स्वतंत्रपणें विचार केला जातो, त्याऐवजीं एकूण ठेवींचाच एकत्रित विचार करणें सोईचें होणार आहे. सध्यां चालू ठेवींच्या ५% आणि मुदत ठेवींच्या २% रिझर्व्हज्ची आवश्यकता असते; आतां सर्वच ठेवींच्या एकजात ५% रिझर्व्हज्ची तरतूद केली जाईल आणि हें प्रमाण १५% पर्यंत वाढविण्याची 'सोय' ठेवली जाईल. बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या बाबतींतहि अशीच दुरुस्ती केली जाईल.

बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या २४ व्या कलमानें शेड्यूल्ड बँकांच्या बाबतींत सांगितलेलें लिक्विडिटीचें प्रमाण २०% आहे, आणि तें एकूण देण्यांशीं जोडलेलें आहे. नुसत्या ठेवींशीं तें प्रमाण २२% पडतें. ह्यापुढें, त्या प्रमाणाचे दोन भाग केले जातील:— (१) स्टॅच्युटरी रिझर्व्ह आणि (२) रोख, सोनें, जादा स्टॅच्युटरी रिझर्व्ह, व मोकळे 'मान्य' रोखे. स्टॅच्युटरी रिझर्व्ह ५% राहील, हें वर आलेंच आहे. दुसऱ्या भागाचा हिशेब करतांना एकूण लिक्विडिटीच्या प्रमाणांतून कॅश रेशो वजा केला जाईल. लिक्विडिटीचें किमान आवश्यक प्रमाण २७½% केलें जाईल. म्हणजे, दुसऱ्या भागांत २२·५% चा समावेश होईल. स्टॅच्युटरी कॅश रिझर्व्हज्चें प्रमाण वाढविलें, तरी हे २२·५% कायमच राहातील. म्हणजे, स्टॅच्युटरी कॅश रिझर्व्ह वाढविला, कीं लिक्विडिटीचें प्रमाणहि आपोआपच वाढेल. उदाहरणार्थ, कॅश रिझर्व्ह ५% चा ७½% करण्यांत आला, तर एकूण लिक्विडिटीचें प्रमाणहि २·५% नें वाढून ३०% होईल. ह्या नव्या प्रमाणांत येण्यासाठी बँकांना कांहीं ठराविक मुदत घालून देण्यांत येईल. किमान रिझर्व्ह न राखल्याबद्दल सध्यां बँकांना दंडादाखल व्याज भरावें लागतें; त्यांतहि दुरुस्ती करण्यांत येणार आहे.

---

**बिहारमधील खाणीसाठी मदत**— बिहारच्या झरिआ भागांत कोळशाची नवीन खाण उघडण्यासाठी नॅशनल कोल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन आणि पोलंडमधील एक कारखाना ह्यांच्या दरम्यान करार झाला आहे. खाणीसाठी लागणारी यंत्रसामग्री पुरविण्याचें पोलंडच्या कारखान्यानें कबूल केलें आहे. ह्या खाणींतून दररोज ७,५०० टन कोळसा बाहेर काढण्यांत येईल असा अंदाज आहे.

**इंडिआ ऑफिस लायब्ररी**—लंडनमधील इंडिआ ऑफिस लायब्ररीच्या भवितव्याबद्दल भारताचे सांस्कृतिक व शास्त्रीय खात्याचे मंत्री श्री. हुमायून कबीर ब्रिटिश सरकारशीं वाटाघाटी करीत आहेत. ह्या ग्रंथालयांत २,८०,००० पुस्तकें असून त्यावर भारत, पाकिस्तान व ब्रिटन आपआपल्या परीनें हक्क सांगत आहे. वाटाघाटींत कांहीं प्रगति झाल्याचें श्री. कबीर ह्यांनीं पत्रकारांच्या बैठकींत सांगितलें.

**शाळेंत जाणाऱ्या मुलांची टक्केवारी**--संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या शैक्षणिक व शास्त्रीय उपसंघटनेनें गोळा केलेल्या माहितीप्रमाणें जगांत शाळेंत जाण्यासारख्या वयाचीं जितकीं मुलें आहेत त्याच्या ६० टक्केच मुलें सध्यां शाळेंत जात असतात. दुसऱ्या महायुद्धानंतर शाळकरी मुलांच्या संख्येंत वाढ झाली असली तरी मानवी हक्कांच्या संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या उद्दिष्टाच्या मानानें ही संख्या कमीच आहे.

## १९६० मधील हिंदी बँकिंग

१९६० मध्यें बँकांनीं दिलेल्या कर्जांत २०८ कोटी रु. ची वाढ झाली. बँकांच्याकडे कर्जांची मागणी किती मोठ्या प्रमाणावर येत आहे, ह्याचें हें निदर्शक आहे. ठेवींत फारच थोडी वाढ झाल्यामुळें बँकांवरील ताण वाढत चालला आहे. त्यामुळें बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडून जास्त कर्जें घेऊन आणि स्वतःजवळील सरकारी रोखे विकून पैशाची तरतूद केली. ठेवींत फक्त ३९ कोटींची भर पडली, पण सरकारी रोख्यांतील गुंतवणूक १५७ कोटी रु. नीं उतरली आणि रिझर्व्ह बँकेकडील कर्जें ५० कोटी रु. नीं वाढलीं. बँकांनीं अधिकाधिक आणि पुरेशा ठेवी आकर्षित केल्याखेरीज उद्योगधंद्यांची पैशाची वाढती मागणी त्या कशी पुरी करूं शकणार, अशी चिंता निर्माण झाली आहे. अमेरिकन कौंटरपार्ट फंड आजवर स्टेट बँकेंत ठेवण्यांत येत असत. त्यामुळें बँकांकडील ठेवींची वाढ आणि गुंतवणुकीची वाढ फुगून दिसत असे, हें खरें आहे. हे फंड जुलै, १९६० पासून दर महिन्यास १२ कोटी रु. प्रमाणें स्टेट बँकेकडून रिझर्व्ह बँकेकडे वर्ग केले जात आहेत. त्यासाठी स्टेट बँकेला रोखे विकावे लागत आहेत. जनतेजवळील शिल्लक पैसा बँकांकडे येण्याऐवजीं तो परस्पर इतरत्र गुंतवला जात आहे, असें आढळतें. बँका बुडण्याच्या प्रकारांचाहि कांहींसा प्रतिकूल परिणाम झाला आहे. ठेवींच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना चालू आहे, तिचा परिणाम दिसून येण्यास थोडा वेळ लागेल. ठेवींत बरीच वाढ झाल्याखेरीज वाढत्या उद्योगधंद्यांचा वाढत्या गरजा भागविल्या जाणें अशक्य होईल आणि मध्यवर्ती व राज्य सरकारांचे कर्जउभारणीचे कार्यक्रम यशस्वी होणें अवघड जाईल.

---

### खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना रशिआची मदत

सुप्रसिद्ध उद्योगपति श्री. जी. डी. बिर्ला नुकतेच रशिआचा दौरा करून परत आले. आपल्या दौऱ्यासंबंधी माहिती सांगतांना मुंबई येथें ते म्हणाले कीं, भारतामधील खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना मदत देण्याची रशिआची तयारी आहे. मात्र तशी परवानगी भारत सरकारकडून मिळाली पाहिजे. रशिआकडून १२ वर्षें मुदतीची व २॥ टक्के व्याजाचा दर असलेलीं दीर्घ मुदतीचीं कर्जें खाजगी उद्योगधंद्यांना मिळू शकतील. रशिआ आणि भारत ह्यांच्या दरम्यानच्या व्यापारांत झपाट्यानें वाढ होणें अगत्याचें आहे. ब्रिटन, पश्चिम जर्मनी, जपान, स्वीडन, इत्यादि पाश्चिमात्य देशहि रशिआशीं अधिकाधिक प्रमाणांत व्यापारी संबंध जोडण्याचा प्रयत्न करीत आहेत. ह्या देशांचीं मोठमोठीं व्यापारी मंडळें रशिआला भेट देत असतात.

### २६ मोठ्या शेडयूल्ड बँकांचें उत्पन्न–खर्च

(५ कोटी रुपयांपेक्षा अधिक ठेवींची बँक = मोठी बँक)

[आंकडे कोटी रु. चे]

| | १९५८ | १९५९ | १९६० |
|---|---|---|---|
| १ एकूण उत्पन्न ... | ६१.५ | ६८.८ | ७५.८ |
| (१) मिळालेलें व्याज व डिस्कौंट ... | ४९.४ | ५५.४ | ६०.६ |
| (२) इतर उत्पन्न ... | १२.१ | १३.४ | १५.२ |
| २ एकूण खर्च ... | ५४.० | ६१.४ | ६६.६ |
| (१) दिलेलें व्याज ... | २७.१ | ३०.८ | ३२.१ |
| (२) पगार इ. खर्च ... | २०.३ | २३.१ | २५.२ |
| (३) इतर खर्च ... | ६.६ | ७.५ | ९.३ |
| ३ निव्वळ नफा ... | ७.५ | ७.४ | ९.२ |

---

### हिंदी बँकांचें वसूल भांडवल अधिक गंगाजळी ह्यांचें एकूण ठेवींशीं प्रमाण %. १९३९–१९६०

| अखेर | शेडयूल्ड बँका | बिगर शेडयूल्ड बँका | सर्व बँका |
|---|---|---|---|
| १९३९ ... | १३ | २५ | १४ |
| १९४५ ... | ६ | ११ | ७ |
| १९४९ ... | ९ | २० | ९ |
| १९५० ... | ९ | २१ | ९ |
| १९५१ ... | ९ | २२ | १० |
| १९५२ ... | ९ | २२ | ११ |
| १९५३ ... | ९ | २१ | १० |
| १९५४ ... | ८ | १९ | ९ |
| १९५५ ... | ७ | १८ | ८ |
| १९५६ ... | ७ | १६ | ७ |
| १९५७ ... | ६ | १८ | ६ |
| १९५८ ... | ५ | १८ | ५ |
| १९५९ ... | ४ | १६ | ५ |
| १९६० ... | ४ | १५ | ४ |

### हिंदी बँकांचें वसूल भांडवल, गंगाजळी व ठेवी

(आंकडे कोटी रु. चे)

| वसूल भांडवल आणि गंगाजळीचा आकार | एकूण वसूल भांडवल आणि गंगाजळी | | | ठेवी (बँकांच्या परस्परांतील ठेवी धरून) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९५८ | १९५९ | १९६० | १९५८ | १९५९ | १९६० |
| १. ५०,००० रु. पेक्षा कमी ... | — | — | — | — | — | — |
| २. ५०,००० रु. ते १ लक्ष रु. ... | ०.५ | ०.५ | ०.५ | १.९ | १.८ | २.० |
| ३. १ लक्ष रु. ते ५ लक्ष रु. ... | ३.७ | ३.३ | ३.३ | २१.० | २१.१ | २०.९ |
| ४. ५ लक्ष रु. ते ५० लक्ष रु. ... | १२.० | १२.१ | ११.५ | ११४.७ | १४२.० | १४८.३ |
| ५. ५० लक्ष रु. वर ... | ६०.१ | ५९.५ | ६०.३ | १२९२.७ | १४९९.४ | १५१८.४ |
| एकूण ... | ७६.३ | ७५.४ | ७५.६ | १४३०.३ | १६६४.३ | १६८९.६ |

### हौशी प्रवाशांच्या संख्येंत वाढ

भारतांत येणाऱ्या हौशी प्रवाशांच्या संख्येनें १९६० सालीं उच्चांक गांठला आहे. पाकिस्तानांतून येणारे प्रवासी सोडून गेल्या वर्षी १,२३,०९५ प्रवासी भारतांत आले. १९५९ सालीं १,०९,४६४ प्रवासी आले होते. टक्केवारीच्या भाषेंत ही वाढ १२·५ टक्के आहे. युरोपमधून आलेल्या प्रवाशांची संख्या ३७,१०७ आहे. अमेरिका व कॅनडा ह्या देशांतून २८,६७८ प्रवासी आले. देशांच्या दृष्टीनें विचार करतां ७५·८ टक्के प्रवासी अमेरिकेहून आले. १९५९ सालीं अमेरिकेंतून आलेल्या प्रवाशांची टक्केवारी ७३·७ होती.

### छोट्या उद्योगधंद्यांना मदत

छोट्या उद्योगधंद्यांना मदत करण्यासाठी राजस्थान सरकारनें राजस्थान स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन लि. ची स्थापना केली आहे. कॉर्पोरेशनचें अधिकृत भांडवल २५ लाख व वसूल भांडवल ५ लाख रुपये आहे. सरकारी, निमसरकारी अगर खाजगी मालकीच्या छोट्या उद्योगधंद्यांना भांडवल पुरविणें, तांत्रिक साह्य देणें, कारभार-विषयक सल्ला देणें, इत्यादि कामें कॉर्पोरेशन करणार आहे. राजस्थानांत सध्यां चालू असलेले कांहीं धंदे कॉर्पोरेशन चालविण्यासाठी घेणार आहे. कॉर्पोरेशनचा कारभार एका बोर्डाकडे सोंपविण्यांत येईल. बोर्डावर ७ सरकारी सभासद असतील आणि २ बिनसरकारी सभासद असतील.

### कोयना योजनेसाठी कर्जाची मागणी

कोयना जलविद्युत् योजनेचा दुसरा टप्पा पुरा करण्यासाठी जागतिक बँकेकडे १·२ कोटी डॉलर्सचें कर्ज मागण्याचें महाराष्ट्र सरकारनें ठरविलें आहे. कर्जाची मागणी भारत सरकारच्यामार्फत करण्यांत येईल. दुसऱ्या टप्प्याच्या प्राथमिक कामास प्रारंभ झाला आहे. ह्या टप्प्याच्या कामासाठीं लागणाऱ्या परदेशीय चलनाची गरज वरील कर्जामधून भागविण्यांत येणार आहे. पहिल्या टप्प्याचें काम झपाट्यानें पूर्ण होत असल्यानें आणि महाराष्ट्रांतील विजेची वाढती मागणी लक्षांत घेतां जागतिक बँकेकडे पुन्हा कर्ज मागण्याची वेळ आली आहे असें मानण्यांत येत आहे. १९५९ सालीं जागतिक बँकेनें कोयना योजनेसाठी २·५ कोटी डॉलर्सचें कर्ज दिलेलें आहे. चालू वर्षअखेर ६०,००० किलोवॅट वीज उत्पन्न होऊन पहिला जनरेटर चालू होईल.

### दर माणशीं करभार

वेगवेगळ्या राज्यांतील १९६०–६१ मधील दरमाणशीं आंकडे येथें दिले आहेत :—

| | | | |
|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | रु. ११·९ | आसाम | रु. १४·६ |
| बिहार | रु. ७·३ | केरळ | रु. १३·० |
| मध्यप्रदेश | रु. ९·२ | मद्रास | रु. ११·६ |
| महाराष्ट्र | रु. १५·४ | म्हैसूर | रु. १२·५ |
| ओरिसा | रु. ६·१ | पंजाब | रु. १५·० |
| राजस्थान | रु. ११·५ | उत्तरप्रदेश | रु. ८·० |
| प. बंगाल | रु. १६·४ | | |

### नासिक जि. मध्यवर्ती स. बँक लि.

सोमवार दिनांक २६ जून १९६१ रोजीं सकाळीं ठीक ९ वाजतां देवळा ( ता. कळवण ) येथें बँकेच्या २६ व्या शाखेचें उद्घाटन मा. दौलतराव झुंझारराव यांचे शुभहस्तें करण्यांत आलें.

### विनोदनावरील खर्चास मर्यादा

गेल्या वर्षी अमेरिकेंतील ३८,००० फर्म्सनीं विनोदनाप्रीत्यर्थ ३१·९ कोटी रु. खर्च केले. जेवणें, राहणें, वाहतूक, मद्य, हे वगळून इतका खर्च झाला. फर्मसाठी केलेला खर्च आणि स्वतः-साठी केलेला खर्च, ह्यांतील रेषा कशी काढावयाची, हा मोठा अवघड प्रश्न आहे. ह्यापुढें गिऱ्हाइकांना दिलेल्या पार्ट्या, दारूविलेलीं नाटकें, दिलेलीं जेवणें, ह्यांचा खर्च करमाफ होणार नाहीं. कोणालाहि रोजचा भत्ता ४५० रु. पेक्षा अधिक मिळणार नाहीं; सध्यां २,२५० रु. एवढा रोजचा भत्ता सुद्धां करमाफ ठरतो !

### लहान बँकांचें मोठ्या बँकांत विलिनीकरण

दि बँक ऑफ कोंकण लि. चें दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. मध्यें सक्तीनें विलिनीकरण झाल्यानंतर कोंकण बँकेच्या कचेऱ्या महाराष्ट्र बँकेच्या बनल्या. मालवण येथील आपल्या नव्या कचेरीचें उद्घाटन करतांना, बँक ऑफ महाराष्ट्र लि. चेअरमन, श्री. वा. पुं. वर्दे आपल्या भाषणांत म्हणाले, कीं कार्यक्षमतेनें चाललेल्या, सुस्थितीमधील लहान बँकांचें, केवळ त्या लहान म्हणून, मोठ्या बँकांत विलिनीकरण केलें जाऊं नये. इतर क्षेत्रांप्रमाणें बँकिंगच्या क्षेत्रांतहि अति एकत्रीकरण हितावह नाहीं, असें त्यांनीं सांगितलें.

### विमानांच्या खरेदीसाठी कर्ज

एअर इंडिआ इंटरनॅशनल कॉर्पोरेशनला २ बोईंग जेट विमानें खरेदी करण्यासाठी अमेरिकन सरकारनें ८० लाख डॉलर्स अथवा ४ कोटी रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. ही मदत अमेरिकेच्या एक्सपोर्ट–इंपोर्ट बँकेमार्फत देण्यांत येणार आहे. बोइंग जेट विमानांत १४४ उतारू बसूं शकतात. त्याची गति तासाला ६०० मैल आहे. मुंबई ते न्यूयॉर्क हा प्रवास ते २३ तासांत करतें. मुंबई ते दिल्ली प्रवास करणाऱ्या एक्सप्रेस रेल्वेगाडीला लागणाऱ्या वेळापेक्षाहि वरील वेळ कमी आहे. सध्यां कॉर्पोरेशनच्या मालकीचीं ४ जेट विमानें आहेत. पंख्याच्या साह्यानें चालणारीं विमानें स्पर्धेत टिकत नसल्यामुळें कॉर्पोरेशन सर्वच विमानें जेटवर चालणारीं घेण्याचा विचार करीत आहे.

**नेवेली येथील पोलादाचा कारखाना**—नेवेली येथें काढण्यांत यावयाच्या पोलादाच्या कारखान्यामुळें दक्षिण भारताची औद्योगिक प्रगति झपाट्यानें होईल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. संकल्पित कारखान्यांत तयार होणारें पोलाद चांगल्या दर्जाचें असेल असें मत पूर्व जर्मनींतील तज्ज्ञांनीं व्यक्त केलें आहे. दक्षिण भारतांत पोलादाचें पुरेसें उत्पादन होत नाहीं, तोंपर्यंत पोलादाच्या ऐवजीं अल्युमिनियम वापरण्याचें सुचविण्यांत येत आहे.

**कलकत्ता येथें सिनेमाच्या कॅमेराचा कारखाना**—सिनेमाला लागणारे कॅमेरे उत्पादन करण्याचा कारखाना कलकत्ता येथें काढण्यांत येणार आहे. कारखान्याची यंत्रसामग्री पूर्व जर्मनीकडून आयात करण्यांत येणार आहे. हा कॅमेराचा प्रकार सगळ्यांत स्वस्त आहे असें म्हणतात. कारखाना छोटेखानी असून त्यामधील यंत्रसामग्रीच्या साह्यानें ८ तासांत ३० कॅमेरे तयार होतात.

**पाकिस्तानांतील चहाची लागवड**—पाकिस्तान सरकारनें चहाची लागवड करणारे ३ नमुनेदार मळे स्थापन करण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक मळा ५०० एकरांचा असेल. ह्यांपैकी दोन मळे चितगांव व सिल्हेर ह्या जिल्ह्यांत स्थापन करण्यांत येतील. तिसरा मळा पश्चिम पाकिस्तानांत लावण्यांत येणार आहे. सध्यां पश्चिम पाकिस्तानांत चहाचा एकहि मळा नाहीं.

## खाद्यपदार्थांचें उत्पादन व लोकसंख्या

( श्री. वा. कृ. कोगेकर, एल. एजी. )

वरील विषयावर अमेरिकेंतील शेतकरी तज्ज्ञांनीं प्रदर्शित केलेले विचार फारच महत्त्वाचे असल्यानें त्यांचें दिग्दर्शन सारांशरूपानें खालीं केलें आहे. हे तज्ज्ञ म्हणतात, शेतकऱ्यानें धान्य-उत्पादनांत खास्सी वाढ केल्याशिवाय १९७५ सालांत धान्यांच्या सांठ्या-ऐवजीं धान्यांची कमतरता भासूं लागेल. कारण, १९७५ सालीं सध्यांच्या प्रत्येक तीन माणसांच्या ऐवजीं चार माणसांच्या खाण्याची व्यवस्था करावी लागेल. याचा अर्थ उघडच आहे. यावरून लोकसंख्येंत वाढीचें प्रमाण कसें होत जाईल याची कल्पना सहज येईल. अमेरिकेंतील शेतकऱ्यांपुढें हा प्रश्न उभा आहे आणि त्यांनीं प्रयत्न करून येत्या १५ वर्षांत धान्य उत्पादनांत ३३% वाढ केली पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे. अमेरिकेची सध्यांची लोकसंख्या १७·७ कोटी आहे. सध्यां दररोज ८ हजार नवीन माणसें जन्माला येतात. याप्रमाणें १९७५ सालीं शेंकडा ३०% जास्त लोकांस पोसावें लागेल; म्हणजे अमेरिकेची लोकसंख्या १९७५ सालीं सुमारें २३ कोटी संख्येस पोहोंचेल. हा आंकडा सर्वसाधारण धरलेला आहे. परंतु तो २४ कोटींवरहि जाईल, कोणास ठाऊक? याकरितां आपल्या देशांतील वाढत्या लोकसंख्येस व परदेशांतील आपल्या मित्र राष्ट्रांतील वाढत्या लोकसंख्येस मदत करण्याकरितां अमेरिकन शेतकऱ्यानें पराकाष्ठा करण्यास लागलें पाहिजे व १९७५ सालापर्यंत २० ते २५% पर्यंत उत्पन्नांत वाढ केली पाहिजे.

उत्पन्न वाढविण्याकरितां करण्यांत येणाऱ्या योजनासंबंधांची रूपरेषा सर्वसाधारणपणें खालीलप्रमाणें आहे :—

(१) पाश्चात्य लोकांचें, मांसान्न हें मुख्य खाद्य असल्यामुळें जनावरांच्या खाद्यांत व्यवस्थितपणा ठेवण्याची कोशिस केली जाते. जनावरांस देण्यांत येणाऱ्या १ पौंड खुराकापासून शेंकडा निदान १०% वाढ त्याजपासून मिळणाऱ्या खाद्यांत झाली पाहिजे.

(२) जनावरांस भरपूर व सकस चारा मिळण्याकरितां शक्य तेथें पिकाखालील जमीन चराऊ रानांकरितां उपयोगांत आणून, चांगलीं गवतें लावून, चराऊ रानांची सुधारणा करण्याकडे लक्ष दिलें पाहिजे.

(३) जास्त उत्पन्न देणाऱ्या व अत्यंत जरूरीच्या अशा पिकांच्या लागवडीच्या बाबतींत विशेष लक्ष घालून त्यांचें उत्पन्न वाढविणें.

(४) प्रत्येक कामकऱ्याच्या प्रत्येक ताशीं होणाऱ्या कामामध्यें वाढ होण्याकरितां व वेळेची बचत करण्याकरितां यंत्रांचा शेतींत उपयोग करणें.

डॉ. ग्लेन बर्टन हे उत्पादक-अर्थशास्त्रज्ञ असून, त्यांचें असें मत आहे कीं वरील उपायांचा अवलंब केल्यानें १९७५ मध्यें उत्पन्नांत अधिक वाढ होण्याची खात्री वाटते.

### वरील सुधारणांशिवाय :—

नवीन जमीन लागवडीखालीं आणल्यानें बराच फायदा होईल. या बाबतींत फारसा वाव नाहीं. तथापि सुमारें तीन कोटी एकर (सध्यांच्या लागवडीखालील क्षेत्राच्या ५%) जमीन नवीन लागवडीखालीं येऊं शकेल.

### उत्पन्नांत वाढ :—

नवीन संशोधनांचा उपयोग शेतकरी जसजसा जास्त प्रत्यक्षांत आणील तसतशी उत्पन्नांत वाढ होणें शक्य होईल.

शेतकी संशोधन शाखेचे प्रमुख मिस्टर एच. एल. स्टुअर्ट यांचें असें म्हणणें आहे कीं लढाई किंवा बाहेर देशांतून धान्याची जास्त मागणी किंवा पिकांचे उत्पन्नांत घट होणें अशा कांहीं अकस्मिक आपत्ती आल्या नाहीत, तर जास्त उत्पादनाच्या बाबतींत आपणास खात्री असून आपला धान्याचा सांठा १० ते २० वर्षें सतत होत राहूं शकेल याबद्दल शंका वाटत नाहीं.

हारवर्ड येथील एक शेतकरी मिस्टर जॉन ब्लॅक म्हणतात कीं, आमची धान्य उत्पन्न करण्याची कुवत सध्यांच्या उपयोगास लागणाऱ्या धान्य-खर्चापेक्षा ५% तरी अधिक होत जाईल याबद्दल शंकाच नाहीं.

वरील सर्व हकीगतीवरून हुशार व कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याचा भविष्यकाळ फारच चांगला असून त्यानें उत्पन्न केलेल्या मालाची प्रत वाढविण्याची जर खटपट केली तर त्या मालास जास्त मागणी येऊन अशा शेतीच्या मालास येणाऱ्या फायद्याचा मोठा भाग शेतकऱ्यासच मिळेल यांत शंका नाहीं.

( फार्मर्स डायजेस्टवरून अनुवाद )

### शेड्यूल्ड बँकांचीं प्रमुख कर्जें

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | ऑक्टोबर १९६० | | ऑक्टोबर १९५९ | |
|---|---|---|---|---|
| | रक्कम | एकूणशीं% | रक्कम | एकूणशीं% |
| १. कारखाने | ५६२·७६ | ५१·२ | ४१८·४८ | ४४·७ |
| २. व्यापार | ३९५·२९ | ३५·९ | ३७३·५५ | ३९·९ |
| ३. शेती | ६·५९ | ०·६ | २५·७२ | २·७ |
| ४. वैयक्तिक | ८६·६६ | ७·९ | ६८·१५ | ७·३ |
| ५. व्यावसायिक | १०·१२ | ०·९ | ९·८३ | १·१ |
| ६. इतर सर्व | ३८·६३ | ३·५ | ४०·०० | ४·३ |
| ७. बेरीज | ११००·०४ | १००·० | ९३५·७१ | १००·० |

### शेड्यूल्ड बँकांच्या औद्योगिक कर्जदारांची छाननी

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | ऑक्टोबर १९५९ | | | ऑक्टोबर १९६० | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रक्कम | एकूण औद्योगिक कर्जाशीं प्रमाण% | संख्या | रक्कम | एकूण औद्योगिक कर्जाशीं प्रमाण% |
| १. सरकारी मालकीचे उद्योग | ५१ | ९·०२ | २·२ | ५९ | १८·७८ | ३·४ |
| २. लिमिटेड कंपन्या | ७,१७५ | ३५८·६३ | ८५·७ | १०,६९० | ४७५·०५ | ८४·४ |
| ३. भागीदाऱ्या व इतर | १८,३७७ | ५०·८३ | १२·१ | २४,१३७ | ६८·९३ | १२·२ |
| एकूण | २५,६०३ | ४१८·४८ | १००·० | ३५,[illegible]८६ | ५६२·२६ | १००·० |

### शेड्यूल्ड बँकांच्या व्यापारी कर्जदारांची छाननी

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | ऑक्टोबर १९५९ | | | ऑक्टोबर १९६० | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रक्कम | एकूण व्यापारी कर्जाशीं प्रमाण | संख्या | रक्कम | एकूण व्यापारी कर्जाशीं प्रमाण |
| लिमिटेड कंपन्या | ४,४०८ | ७५·८५ | ३०·१ | ६,४४७ | १०७·१९ | २८·५ |
| भागीदाऱ्या व इतर | ८२,५८९ | १७६·०८ | ६९·९ | १,५२,३१९ | २६८·४६ | ७१·५ |
| एकूण | ८६,९९७ | २५१·९३ | १००·० | १,५८,७६६ | ३७५·६[illegible] | १००·० |

### कामगार-संघटनांनीं नवा दृष्टिकोण स्वीकारावा

मध्यवर्ती सरकारच्या मजूरखात्याचे उपमंत्री श्री. एल. एन. मिश्रा ह्यांनीं कामगार-संघटनांनीं आपल्या कार्यासंबंधीं नवीन दृष्टिकोण स्वीकारावा असा विचार बोलून दाखविला आहे. श्री. मिश्रा नॅशनल कोल ऑर्गनायझेशन एम्प्लॉयीज असोसिएशन-पुढें भाषण करीत होते. ते म्हणाले कीं कामगार संघटनांनीं नेहमीं तक्रारीच केल्या पाहिजेत असें नाहीं. आतांपर्यंत मात्र मालक-चालकांना विरोध करणें एवढेंच आपलें काम असल्याचें कामगार-संघटना मानीत असल्याचें दिसतें. मालक काय अगर कामगार काय, दोघांच्याहि संघटना आपल्या हक्कांची व हितसंबंधांचीच चर्चा मुख्यत: करतांना दिसतात. ह्या परंपरेपासून मोकळे होण्याचा प्रयत्न करण्याची वेळ आतां आली आहे. कामगार संघटनांनीं आपल्या हक्कांची व हितसंबंधांची काळजी जरूर घ्यावी; पण त्याचबरोबर आपल्या कर्तव्याचीहि जाणीव ठेवावी. त्याचप्रमाणें ज्या औद्योगिक संस्थेंत कामगार काम करतात, त्या संस्थेच्या चालकांशीं सहकार्य करण्याचे मार्गहि त्यांनीं शोधून काढले पाहिजेत. नुसत्या बंडखोरीची भाषा नेहमींच बोलण्यापेक्षा सह-कार्याची भाषा बोलणें दोघांच्याहि हिताचें ठरेल. सार्वजनिक मालकीच्या क्षेत्रांतील कामगार-संघटनांवर ह्या बाबतींत विशेष जबाबदारी पडते. सार्वजनिक क्षेत्रांतील कारखाने व औद्योगिक संस्था ह्यांच्या यशस्वी कारभारावर देशाची औद्योगिक प्रगति अवलंबून आहे. ह्या क्षेत्रांतील चालकवर्गावरहि तितकीच जबाब-दारी आहे. सार्वजनिक क्षेत्रांतील चालक व कामगार संघटना ह्यांच्या सहकार्याशिवाय देशाच्या प्रगतीसाठी आंखण्यांत येत असलेले महत्त्वाकांक्षी कार्यक्रम यशस्वी होणार नाहींत. त्यांना इतरांना उदाहरण घालून दिलें पाहिजे.

### पाणीपुरवठ्यासाठी बिहारची मोठी योजना

बिहारमधील शेतजमिनीला पाण्याचा मुबलक व निश्चित पुरवठा व्हावा म्हणून राज्य सरकारनें एक मोठी योजना आखली आहे. ह्या योजनेसाठी १८४ कोटी रुपये खर्च येणार असून ती पुरी झाल्यावर १०४ लाख एकर जमिनीला पाण्याचा हुकमी पुरवठा होऊं लागेल. योजना पूर्ण होण्यास १५ वर्षे लागतील. ह्या योजनेच्या पहिल्या टप्प्यांत मोठ्या व छोट्या पाटबंधाऱ्यांच्या कामावर ६१·६७ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस बिहारमधील ३८·५८ लाख एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होऊं लागेल पाणी-पुरवठ्याच्या योजनेशिवाय पूरप्रतिबंधक बांधबंदिस्तीच्या कामावर ९·९० कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. १९५१ साला-पूर्वी बिहारमध्यें १०·३७ लाख एकर जमीन कालव्याच्या पाण्याखाली भिजत असे. पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत त्यांत आणखी १३ लाख एकरांची भर पडली. राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत शेती आणि औद्योगिक शक्ति ह्यांना प्राधान्य देण्यांत आलें असून त्यांच्या खालोखाल पाटबंधाऱ्यांवर खर्च होणार आहे. राज्यांतील कोसी, गंडक, आणि शोण ह्या तीन नद्यांचा पाटबंधाऱ्यांच्या कामासाठी उपयोग करून घेण्यांत येणार आहे. सर्व कामावर मिळून ४७·१२ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. पैकीं कोसी नदीच्या धरणावर व तेथून काढण्यांत येणाऱ्या कालव्यावर अधिक खर्च होईल. १९६४ अखेर पूर्वेकडे वाहाणारा दीर्घ लांबीचा कालवा तयार होईल. त्यामुळें अन्नधान्याच्या व व्यापारी पिकांच्या लागवडीला चांगलें उत्तेजन मिळेल, व सुमारें १०·३० लाख मण अधिक पिकांची पैदास होईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

### सेवा सहकारी संस्था

एक जुलै, १९५९ ते ३१ ऑक्टोबर, १९६० या काळांत ३३,१९० सहकारी संस्थांची पुनर्रचना करून त्यांचें सेवा सहकारी संस्थांत रूपांतर करण्यांत आलें. कर्जविषयक सोयी-सवलती, खतें, बीं-बियाणें, शेतकी अवजारें, इत्यादींचा पुरवठा आणि एकंदरींत आवश्यक साधनसामग्री-पुरवठा व इतर सोयी-सवलती उपलब्ध व्हाव्या हा या पुनर्रचनेमागें हेतु आहे.

सर्वसामान्यपणें खेडें हा घटक धरून सेवा सहकारी संस्था स्थापन करण्यांत येतात. तथापि, खेडें अगदींच लहान असेल तर अशा छोट्या खेड्यांचा गट करून त्यांच्यासाठी सेवा सहकारी संस्था स्थापन केली जाते. यावेळीं तिच्या कक्षेंत ३,००० पेक्षा अधिक लोकवस्ती येणार नाहीं व केंद्रस्थानीं असलेल्या खेड्यांपासून ती ४ मैलांहून अधिक अंतरावर असणार नाहीं अशी काळजी घेतली जाते.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत २८,७५० नव्या सेवा सहकारी संस्था स्थापन करण्याचा विचार असून दुसऱ्या योजनेच्या अखेरीस ज्या खेड्यांत अशा संस्था स्थापन झालेल्या नाहींत तेथें त्या स्थापन व्हाव्या हा यामागें उद्देश आहे. सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँका व अपेक्स को-ऑपरेटिव्ह बँका आणि जमिनींच्या तारणावर कर्ज देणाऱ्या बँकांना मजबुती आणणें आणि २६० नव्या प्रायमरी लॅण्ड मॉर्गेज बँका स्थापणें इत्यादींचा तिसऱ्या योजनेंत अंतर्भाव आहे.

### यंत्रसामग्रीचा विमा उतरण्याची जरूरी

न्यू इंडिआ अॅशुरन्स कंपनीचे उपव्यवस्थापक श्री. पी. पी. पटेल ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं गेल्या १० वर्षांच्या कालांत भारतांत यंत्रसामग्रीचा विमा उतरण्याच्या बाबतींत बरीच प्रगति झाली आहे. औद्योगीकरणाचा वेग वाढत गेल्यामुळें असें होणें अपरिहार्यच होतें. यंत्रसामग्रीला धोका पोंचूं नये म्हणून तिचा विमा उतरण्याची प्रवृत्ति उद्योगपतींमध्यें वाढत चाललेली आहे.

### तेलशुद्धीचा प्रायोगिक कारखाना

खंबायत येथें तेलशुद्धीचा प्रायोगिक कारखाना लवकरच सुरू करण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यांत दररोज १०० पिंपें तेल शुद्ध करण्यांत येईल. कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री संपूर्णपणें भारतांत बनविण्यांत आली आहे. देशांतील तेलशुद्धीचे मोठे कारखाने चालविण्यासाठी जरूर तो अनुभव कारखान्यामुळें मिळूं शकेल.

### कुटुंबनियोजन कार्यक्रमांतील प्रगति

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत एकूण ३,८३९ कुटुंबनियोजन केंद्रें स्थापन झालीं असून मुलें होऊं नयेत म्हणून एकूण १,२३,७०७ व्यक्तींवर शस्त्रक्रिया करण्यांत आल्या. या कार्य-क्रमासाठी सदर योजनेंत ४·९७ कोटी रु. देण्यांत आले होते त्यांपैकी ४·५० कोटी रु. प्रत्यक्षांत खर्च झाले. १९६१-६२ साठी ३·५५ कोटी रु. मदत मंजूर झाली. सदर योजनेंत शिक्षण-कार्यक्रमानुसार निरनिराळ्या राज्यांत मिळून ३,७२७ कार्यकर्त्यांचें शिक्षण पूर्ण झालें. मार्च, १९६१ पर्यंत भरलेल्या ६२ शिक्षण-शिबिरांत एकूण १२,७८१ जणांनीं भाग घेतला होता.

## खेड्यांतील बेकारीवर उपायांची जरूरी

तामीलनाड सर्वोदय संघाची तिसरी वार्षिक बैठक श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यांत आली. ह्या प्रसंगीं बोलतांना श्री. मेहता म्हणाले, कीं तामीलनाड सर्वोदय संघानें आपल्या कार्याची आंखणी जिल्हानिहाय करण्याचें ठरविलें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. परंतु अशा प्रकारचें विकेंद्रीकरण करणें सोपें नाहीं. सर्वोदय संघटनेंत काम करणाऱ्यांनीं ग्रामीण जनतेकडे पाहण्याचा दृष्टिकोण योग्य असा ठेवला तर खादी व ग्रामोद्योग संघटनेनें पुरस्कृत केलेल्या योजना पार पाडण्यांत यश आल्याशिवाय राहाणार नाहीं. सर्वोदय संघटनेंत काम करणाऱ्यांनीं आपल्या विवक्षित कामाकडेच फक्त लक्ष पुरवावयाचें ठरविलें तर ते योग्य होणार नाहीं. ग्रामीण अर्थव्यवस्था ही एकजिनसी असून तिचे आणि खेड्यांतील कामगारांचे हितसंबंध एकच आहेत हें लक्षांत ठेवण्यांत आलें पाहिजे. सध्यां खेड्यांतील कामगारांना बेकारीला व अर्धबेकारीला तोंड द्यावें लागतें. खादीच्या प्रसाराचें काम करणाऱ्यांची अशी समजूत झालेली दिसते कीं दूरदूरच्या गांवीं चरखा सुरू केला कीं काम संपलें. खेड्यांतून अजूनहि टिकून असलेल्या छोट्या उद्योगधंद्यांकडे त्यांचें लक्ष जात नाहीं. देशाच्या निरनिराळ्या भागांत सर्वोदय मंडळें काढण्यांत आलेलीं आहेत. खेड्यांतील उद्योगधंद्यांचें पुनरुज्जीवन करून लोकांना कामधंदा देणें हा अशा मंडळांचा मुख्य उद्देश आहे. देशांतील पंचवार्षिक योजनांमुळें अनेक उद्योगधंदे स्थापन झाले आहेत. परंतु ह्या उद्योग-धंद्यांतून रोजगार मिळालेल्यांची संख्या मर्यादित आहे. गेल्या १० वर्षांत भारतांत जे मोठे उद्योगधंदे निघाले त्यामधून फारतर ५ लाख लोकांना कामधंदा मिळाला. खेड्यांतील बिगर शेती उत्पादनाला उत्तेजन देऊन ग्रामीण भागांतील बेकारीला आळा घालता येईल. त्या दृष्टीनें पुढील पंचवार्षिक कार्यक्रमांत सुधारणा झाली पाहिजे.

---

## शेतीच्या मालाचें संस्करण करणाऱ्या सहकारी संस्था

शेतीच्या मालाचें संस्करण करणाऱ्या सहकारी संस्थांची सध्यांची परिस्थिति, त्यांची संघटना, इत्यादि प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट अँड वेअर हौसिंग बोर्डानें एक कमिटी नेमली होती. ह्या कमिटीनें आपला अहवाल आतां तयार केला आहे. अहवालांत असें म्हटलें आहे कीं ऊंस इतर शेतीच्या मालांवर संस्कार करून नवीन पदार्थ बन-विणाऱ्या ज्या सहकारी संस्था आहेत त्यांना आर्थिक मदत मिळण्याच्या कामीं अग्रहक्क देण्यांत यावा. अशा संस्थांना प्रत्येक राज्याच्या स्टेट फायनॅन्स कॉर्पोरेशननें कर्जाच्या रूपानें आर्थिक साह्य द्यावें. विशेषतः मोठ्या भांडवली खर्चासाठी अशी मदत देण्यांत यावी आणि राज्य सरकारांनीं कर्जाची हमी घ्यावी. अशा सहकारी संस्थांना जी यंत्रसामग्री लागेल ती नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कमिशननें हप्तेबंदीनें पुरवावी. भारत सरकारच्या क्रेडिट गॅरंटी योजनेप्रमाणें छोट्या उद्योगधंद्यांना पतपेढ्यांनीं दिलेल्या कर्जाची हमी रिझर्व्ह बँक घेते. हीच योजना शेतीच्या मालाचें संस्करण करणाऱ्या सहकारी संस्थांनाहि लागूं करण्यांत यावी. सहकारी साखर कारखाने सोडून इतर सहकारी संस्थांना गुदामे बांधण्यासाठी पैशाची मदत देण्यांत यावी. सध्यां भाताच्या गिरण्यांबाबत जें धोरण स्वीकारण्यांत आलें आहे तेंच सहकारी संस्थांच्या बाबतींत स्वीकारण्यांत यावें. म्हणजे शेतीच्या मालाचें संस्करण करण्यासाठी वाजवी मुदतींत जर एखादी संस्था पुढें आली नाहीं तरच खाजगी व्यक्तींना संस्करणाच्या कारखान्याची परवानगी देण्यांत यावी. शेतमालाचें संस्करण करणाऱ्या कार-खान्यांचे नमुनेदार आराखडे भारत सरकारच्या समाजविकास व सहकारी खात्यातर्फे तयार करण्यांत यावेत. अशा आराखड्यांचा उपयोग करून नव्या संस्था स्थापन करणें सुलभ होईल.

## दारूबंदीचा प्रसार झपाट्यानें करणें शक्य

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत हिंदमध्यें दारू-बंदीचा प्रसार झपाट्यानें करण्यास हरकत असूं नये, असा सल्ला नियोजन समितीनें राज्य सरकारांना दिला आहे. दारूबंदीमुळें राज्य सरकारांना उत्पन्नाचा कांहीं भाग गमवावा लागेल. तथापि ह्या कारणासाठी दारूबंदीचा प्रसार झपाट्यानें करण्याचें कार्य सोडून देण्याचें कारण नाहीं असें मत समितीनें व्यक्त केलें आहे. राज्य सरकारांनीं दारूबंदीचें क्षेत्र वाढविल्यामुळें त्यांना जें कमी उत्पन्न होईल त्यापैकी कांहीं नुकसान मध्यवर्ती सरकार सोसणार असल्याचें समितीनें स्पष्ट केलें आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यांत सरकारच्या ह्या धोरणाची रूपरेखा स्पष्टपणें मांडण्यांत येणार आहे. ह्या बाबतींत बोलतांना नियोजन समितीचा एक प्रवक्ता म्हणाला कीं ज्या राज्य सरकारांनीं अजूनपर्यंत दारूबंदीचा कार्यक्रम हातीं घेतलेला नाहीं त्यांना दारूपासून दरसाल सुमारें ४० कोटी रुपयांचें उत्पन्न होतें असा अंदाज करण्यांत आला आहे. सध्यां महाराष्ट्र, गुजरात, मद्रास, आंध्र आणि म्हैसूर राज्यांत दारूबंदीचा अंमल चालू आहे. केरळ राज्यांत लवकरच दारूबंदी सुरू करण्यांत येणार आहे. तेव्हां दारूबंदीचा प्रश्न हा मुख्यतः उत्तर भारताशीं निगडित आहे. उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, ओरिसा, पश्चिम बंगाल, पंजाब, राजस्थान आणि आसाम ह्या राज्यांतून दारूबंदीचा प्रसार व्हावयास पाहिजे. उत्तर प्रदेशाच्या ५० जिल्ह्यांपैकी ११ जिल्ह्यांत दारूबंदी जारी आहे. मध्य प्रदेशां-तील कांहीं जिल्ह्यांतहि दारूबंदी करण्यांत आली आहे. इतर राज्यांत मात्र अद्याप सुरुवात करण्यांत आलेली नाहीं. लोकांच्या सहकार्यानें दारूबंदीचें क्षेत्र वाढविण्यासाठी काय करतां येईल ह्याचा विचार करण्यासाठी पुढील सप्टेंबरमध्यें दिल्ली येथें एक परिषद भरणार आहे.

---

## नाणीं वितळवून धातू मिळविणें गुन्हा होणार

सध्यां देशांत चालू असणारीं नाणीं वितळवून एखाद्यानें त्यामधील मूळची धातू हस्तगत केली तर आज तो गुन्हा होत नाहीं. परंतु भारत सरकार आतां ह्यासंबंधीं कायदा करून नाणें वितळवून धातू मिळविणें हा गुन्हा ठरविणार आहे. ज्या धातूंत लोखंडाचें मिश्रण नाहीं, अशा प्रकारच्या तांब्यासारख्या धातूचा देशांत अपुरा पुरवठा आहे. त्यामुळें अर्थातच त्यांच्या किंमती चढ्या आहेत. ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन कांहीं लोक नाणीं वितळवून त्याची मूळची धातू करीत असल्याचें उघडकीस आलें आहे. एका नया पैशांत ९७ टक्के तांबें असतें आणि त्याची अधिकृत किंमत ०·६ नये पैसे असते. पण प्रत्यक्ष बाजारांत मात्र तांब्याची किंमत बरीच अधिक असते. त्यामुळें नये पैसे वितळवून त्यांचें तांबें करून विकण्याची प्रवृत्ति उत्पन्न झाली आहे. भारताला लागणारें बहुतेक तांबें परदेशांतून आयात करावें लागतें व त्या कामीं दुर्मिळ असें परदेशीय चलन द्यावें लागतें. कांहीं गांवांतून तर नये पैसे गोळा करून त्यांचें तांबें करणाऱ्या टोळ्याच आढळून आल्या आहेत. पण असें करणें म्हणजे काय-द्याच्या दृष्टीनें गुन्हा नाहीं असें सरकारला आढळून आलें. म्हणून आतां नवीन कायदा करण्याचें घाटत आहे. तथापि कायदा करून तरी वरील प्रकार थांबवितां येईल किंवा नाहीं ह्याची शंका वाटण्यासारखी परिस्थिति आहे. कारण नाणीं वितळविण्याच्या ह्या 'धंद्यांत' नफ्याचें प्रमाण फार मोठें आहे. त्यामुळें अशा प्रकारचे गुन्हे पकडण्यासाठी व गुन्हेगारांना शासन करण्यासाठी सरकारला मोठी यंत्रणा उभारावी लागण्याचा संभव आहे. कायदा यशस्वी झाला नाहीं तर सरकारला नाणीं पाडतांना हलक्या प्रतीची अल्युमिनियम सारखी धातू वापरावी लागेल. पुष्कळ देशांतून अल्युमिनियम-मिश्रित नाणीं वापरण्यांत येत आहेत.

## साखर भरपूर, पण महाग !

अमेरिकेनें भारताला बाजारभावापेक्षा जास्त किंमत देऊनहि त्याची साखर खरीदण्याचें मान्य केलें आहे, तरीसुद्धां दर टनास २०० रु. एवढा तोटा निर्गतीमध्यें आपणांस सोसावा लागणार आहे. जागतिक बाजारपेठेंत साखरेचा भाव टनास सुमारें ३० पौंड आहे, तर अमेरिका आपल्या साखरेस टनास ४२ पौंड एवढी किंमत देणार आहे. म्हणजे, आपल्या साखरेस बाजारभावापेक्षा ४०% जास्त किंमत देऊनहि आम्हांला नुकसानच येत आहे ! सुमारें २·२५ लक्ष टनांच्या निर्गतींत ४·५ कोटी रु. चें नुकसान अपेक्षित आहे. इतर देशांकडे होणाऱ्या १·२ लक्ष टनांच्या निर्गतींत ह्यापेक्षांहि नुकसान सोसावें लागेल हें उघड आहे. त्याची रक्कम सुमारें ५ कोटी रु. भरेल. म्हणजे, निर्गतीमुळें मिळणाऱ्या १६ कोटी रुपयांचे पायीं १० कोटी रु. चें नुकसान होईल. भारतांतील साखरेचें उत्पादन झपाट्यानें वाढत असलें, तरी त्याच्या उत्पादनाचा खर्चहि अवास्तव आहे; उसाचें दर एकरीं उत्पादन आणि साखरेचा दर टनी उतारा कमी आहे. वार्षिक उत्पादनापैकीं शिल्लक राहणाऱ्या सुमारें आठ लक्ष टन साखरेचें अशा परिस्थितींत काय करावयाचें, हा मोठा बिकट प्रश्न आहे. उत्तर प्रदेश आणि बिहार येथील उसाचें दर एकरीं उत्पादन अत्यंत कमी आहे, पण तेथेंच साखरेचा धंदा मोठ्या प्रमाणावर असून एकूण उत्पादनाच्या ६०% उत्पादन तेथेंच होतें. दाक्षिण भारतांत आणखी नवे कारखाने काढून आणि उसाचें दर एकरीं उत्पादन दुप्पटीइतकें वाढवून ही समस्या सोडवावी लागेल.

---

## कर्जदारांच्या नफ्यांत इं. फि कॉर्पोरेशनची भागीदारी ?

इंडस्ट्रिअल फायनॅन्स कॉर्पोरेशन ज्या कर्जदारांना कर्ज देतें, त्यांच्या नफ्यांत तिला वाटा असण्याची तरतूद लवकरच केली जाणार आहे. ह्यासंबंधीं अद्याप अंतिम निर्णय घेण्यांत आलेला नाहीं. तथापि, फक्त नव्या कर्जांनाच ही अट लागू केली जाईल, असें समजतें. कॉर्पोरेशनचे निवृत्त होणारे चेअरमन, श्री. के. आर. के. मेनन ह्यांनीं खुलासा करतांना सांगितलें कीं, अशी पद्धत कित्येक देशांतून अमलांत आहे. कर्जाच्या रकमेचें भाग-भांडवलांत रूपांतर करण्याचा अधिकारहि कॉर्पोरेशनला देण्यांत यावा, अशी कल्पना आहे. ३० जून, १९६१ अखेर संपलेल्या वर्षी कॉर्पोरेशननें २१·२१ कोटी रुपयांच्या ५७ कर्जास मंजुरी दिली.

ह्यापूर्वी कोणत्याहि वर्षी इतक्या रकमेचीं कर्जे मंजूर करण्यांत आलीं नव्हतीं. दिलेल्या कर्जांची रक्कम आतां १०० कोटी रुपयांवर झाली आहे. १९६०–६१ मध्यें मंजूर केलेल्या कर्जांपैकीं सर्वांत जास्त साखरेच्या कारखान्यांस आहेत; आणि त्यांपैकीं ४·६५ कोटी रु. चीं कर्जे सहकारी कारखान्यांना मिळालीं आहेत. कॉर्पोरेशनच्या कर्जदारांच्या पात्रतेबद्दल आणि परतफेडीच्या दक्षतेबद्दल चेअरमननीं प्रशंसोद्गार काढले आहेत.

## बँकांच्या कर्जांना रिझर्व्ह बँकेची गॅरंटी

लहान उद्योगधंद्यांना बँकांनीं द्यावयाच्या कर्जास रिझर्व्ह बँकेनें गॅरंटी द्यावयाच्या योजनेची व्याप्ति वाढविण्यांत आली असून, आणखी २६ जिल्ह्यांना ती लागू करण्यांत आली आहे. गेल्या जुलैमध्यें ही योजना प्रथम २२ जिल्ह्यांत अमलांत आली आणि त्यांत ४ जिल्ह्यांची पुढें भर घालण्यांत आली. म्हणजे, आतां ५२ जिल्ह्यांना ह्या योजनेचा फायदा मिळूं लागणार आहे. पुणें जिल्हा आतां ह्या योजनेंत समाविष्ट होत आहे. योजनेच्या अंमलबजावणींत येत असलेल्या कांहीं व्यावहारिक अडचणीहि दूर करण्यांत आल्या आहेत.


# भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,०८,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस | ... | रु. ९१,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याज-वसुली, पेन्शन, कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. १६१–६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

| | |
|---|---|
| श्री. म. त्र्यं. शिंगरे<br>अध्यक्ष | न. भू. ना. पां. थोपटे<br>उपाध्यक्ष |
| श्री. गो. बा. देवी | श्री. बा. ग. धंपुके |

---

गेलीं सतत तीस वर्षे लोकसेवेच्या आघाडीवर ठेवीदारांचे विश्वासास पूर्णपणें पात्र झालेली व शेअर होल्डरसना योग्य मोबदला देणारी

# दि बेळगांव बँक लिमिटेड

हेड ऑफिस—बेळगांव

स्थापना ) (शेड्यूल्ड बँक) ( १९३०

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रुपये | ८,००,००० |
| गंगाजळी | रुपये | ४,८६,००० |
| एकूण ठेवी | रुपये | १,७५,००,००० वर |

बँक कॉल डिपॉझिट व अल्प मुदतीच्या ठेवी, आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारते.

समक्ष चौकशी करा.

होम सेव्हिंग्ज डिपॉझिटवर द. द. ३ टक्के व्याज. एक ते पांच वर्षे मुदतीच्या ठेवींचे व्याजाचे दर द. द. ३½ ते ४½

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी

जनरल मॅनेजर

**चांगल्या सामूला बक्षीस**—इटलीमधील एका खेड्यांतील लोकांनी चांगल्या सासवांना तीन क्रमांकापर्यंत बक्षिसें देण्याची एक योजना जाहीर केली आहे. ह्या स्पर्धेत भाग घेणाऱ्या सासवांना सुनांनीं पाठविलेलें असलें पाहिजे, किंवा जे जांवई आपल्या सामूच्या घरांतच राहून असतील त्यांनीं त्यांची निवड स्पर्धेसाठीं केलेली असली पाहिजे. पहिलें बक्षीस सोन्याच्या अलंकाराचें असून बाकीचीं दोन चांदीचीं आहेत.

**पाकिस्तानची साखरेची आयात**—पाकिस्तानांत साखरेचा तुटवडा भासूं लागल्यानें पाकिस्तान सरकारनें परदेशांतून साखर आयात करण्याचें ठरविलें आहे. चालू महिन्यांत आयात केलेल्या साखरेची विक्री पाकिस्तानांत सुरू होईल. एकूण ५०,००० टन साखर आयात करण्यांत येणार आहे. साखर पुरविण्यासाठी १६ देशांनीं टेंडर्स पाठविलीं आहेत; भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननेंहि टेंडर धाडलें आहे.

**राजकारणापासून दूर राहा**—शिलाँग येथें स्त्रियांच्या एका संघटनेंत भाषण करतांना भारताचे गृहमंत्री श्री. शास्त्री म्हणाले कीं, परदेशांतूनसुद्धां कायदेमंडळांतून फारशा स्त्रिया दिसत नाहींत. भारतामधील स्त्रियांनीं राजकारणापासून शक्य तितकें दूर राहावें. त्यांनीं आपलें लक्ष समाजसेवेवर केंद्रित करावें. तेंच त्यांचें कार्यक्षेत्र असून त्या क्षेत्रांत त्या उत्तम काम करूं शकतील.

**रंगीत पोलादाची निर्मिति**—अमेरिकेंतील पोलादाच्या धंदेवाल्यांनीं रंगीत पोलाद तयार करण्याची पद्धत शोधून काढली आहे. ह्या पद्धतीचा उपयोग करून पोलादाच्या पत्र्यांत अनेक रंगाच्या छटा व आकृति काढतां येतील. शिवाय, नव्या पोलादाच्या घडणीमुळें दृष्टीनें अगर स्पर्श करूनहि तें पोलाद असल्याचें समजणार नाहीं. 'स्टीलवेज' ह्या अमेरिकन नियतकालिकांत ही माहिती प्रसिद्ध करण्यांत आली आहे.

**रशिअन पंतप्रधानांची भेट**—अमेरिकेंतील एका १० वर्षांच्या मुलीनें निरनिराळ्या देशांच्या प्रमुखांना पत्रें लिहून बाहुल्या पाठविण्याची विनंती केली आहे. ह्या मुलीनें रशिअन पंतप्रधान मि. क्रुश्चेव्ह ह्यांनाहि अशीच विनंती पत्रद्वारें केली होती. रशिअन पंतप्रधानांनीं मुलीला एक लाकडी बाहुली भेट म्हणून पाठविली आहे. ही मुलगी जागतिक राजकारणावरहि राज्यप्रमुखांना आपल्या दृष्टिकोणांतून पत्रें लिहिते.

**भारत सेवक समाजाचें कार्य**—भारत सेवक समाजातर्फे साताऱ्यापासून २७ मैलांवर असलेल्या खटाव गांवीं एक युवक शिबीर भरविण्यांत आलें होतें. शिबिरांत भाग घेणाऱ्या तरुणांनीं प्रथम एकच रस्ता बांधण्याचें ठरविलें होतें. परंतु गांवकऱ्यांनीं चांगलें सहकार्य दिल्यामुळें त्यांनीं ५ रस्ते बांधून दिले. खटाव गांवांतील व तालुक्यांतून ५० सामाजिक कार्यकर्ते आले होते. ते रोज ६ तास शारीरिक काम करीत. शिवाय, त्यांच्यासाठीं व्याख्यानेंहि ठेवण्यांत आलीं होतीं.

**पनवेलजवळ नवे कारखाने**—पनवेलजवळ स्थापन करण्यांत येणाऱ्या औद्योगिक विभागांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणाऱ्या छोट्या उद्योगधंद्यांना प्राधान्य देण्यांत येणार आहे. औद्योगिक विभागाचें क्षेत्र १५० एकर आहे. सुमारें ५० उद्योगपतींकडून कारखाने काढण्यासाठी परवानगी मागण्यांत आली आहे. वीज व पाणीपुरवठ्याबाबत पनवेल नगरपालिकेचें सहकार्य घेण्यांत येत आहे.

**काश्मीरच्या महाराजांचा तनखा**—काश्मीरचे दिवंगत महाराज हरिसिंग ह्यांना मिळणारा तनखा काश्मीरचे सद्र-इ-रियासत युवराज करणसिंग ह्यांनाहि देण्यांत येणार आहे. स्वतःचा तनखा व वडिलांचा तनखा मिळून त्यांना सालीना ९ लाख रुपये मिळतील. त्याशिवाय युवराजांच्या आईला पूर्वीप्रमाणें दरसाल १ लाख रुपये तनखा चालू राहणार आहे. दिवंगत महाराजांना सालीना ५ लाख रुपये तनखा होता.

**आदिवासींच्या परिस्थितीची पहाणी**—महाराष्ट्र सरकारच्या विनंतीवरून टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस ह्या संस्थेनें कोसबाड येथील आदिवासींच्या परिस्थितीची पहाणी करण्याचें ठरविलें आहे. डहाणूपासून ५ मैलांवर असलेल्या ह्या गांवीं २,००० आदिवासी राहातात. ह्या कामासाठी राज्य सरकारनें ८,००० रुपये मंजूर केले आहेत. आदिवासींच्या दैनंदिन जीवनक्रमाविषयीं शक्य तितकी माहिती गोळा करण्यांत येणार आहे.

**शेतकऱ्यांच्या जमिनी परत**—कोल्हापूर विभागांतील कांहीं खाजगी साखरेचे कारखाने त्यांच्याकडे खंडानें असलेल्या जमिनी तिच्या मूळच्या मालकांना परत देत आहेत. महाराष्ट्र सरकारच्या जमीन-धारणा विधेयकाला अनुसरून कमाल मर्यादेपेक्षा अधिक असलेली जमीन सरकार आपल्याकडे घेऊं शकते व ती एकत्रित करून सहकारी शेती स्थापन करूं शकतें. ही जमीन बिगर-शेती कामासाठी वापरतां येत नाहीं.

**मि. क्रुश्चेव्ह ह्यांच्या जीवनावर चित्रपट**—रशिआचे पंतप्रधान मि. क्रुश्चेव्ह ह्यांच्या जीवनासंबंधीं एक चित्रपट तयार करण्यांत आला आहे. एका भागांत ते मॉस्को येथील कम्युनिस्ट पक्षाचे प्रमुख असतानाचें चित्रण करण्यांत आलें आहे. दुसऱ्या भागांत दुसऱ्या महायुद्धांत रशिअन लष्कराला जर्मनीवर विजय मिळवून देण्यांत त्यांनीं केलेल्या कामगिरीचें चित्रण करण्यांत आलें आहे.

**कोळशाच्या धंद्यासाठीं कर्ज**—हिंदमधील खाजगी मालकीच्या कोळसाखाणीसाठीं जागतिक बँकेकडून कर्ज मिळविण्याचा प्रयत्न चालू आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील खाजगी मालकीच्या खाणींच्या उत्पादनाचें लक्ष्य १·७ कोटी टनांनीं वाढविण्यांत आलें आहे. त्यामुळें खाणींची सुधारणा करणें प्राप्त झालें आहे. सुधारणेच्या कार्यक्रमासाठी ३० कोटी रुपयांचें परदेशी चलन लागेल.

**वैमानिक प्रवासाच्या भाड्यांत वाढ**—भारतांतर्गत विमान-वाहतूक करणाऱ्या इंडिअन एअर लाइन्सच्या दरांत वाढ होणार आहे. व्हायकाउंट विमानांच्या दरांत १० टक्के वाढ होणार असून डकोटा विमानांच्या दरांत ५ टक्के वाढ होणार आहे. इंडिअन एअर लाइन्स कॉर्पोरेशनच्या नोकरांचे पगार वाढल्यामुळें प्रवासाचे दर वाढवावे लागले. कॉर्पोरेशनच्या मुख्य मार्गावर सध्यां ८ व्हायकाउंट विमानें वापरांत आहेत.

**पुरुषांसाठी संततिनियमनाची गोळी**—अमेरिकन शास्त्रज्ञ डॉ. जॉन मॅकूलिऑड ह्यांनीं पुरुषांना उपयोगी पडणारी संततिनियमनाची गोळी शोधून काढली असून तिचा उपयोग बऱ्याच प्रमाणांत यशस्वी झाला आहे. गोळीमुळें पुरुषाची जननक्षमता तात्पुरती नाहींशी होते. परंतु पुरुषांत कोणत्याहि प्रकारची विकृति मात्र निर्माण होत नाहीं. ह्या गोळीचा शोध दुसऱ्या एका रोगावरील औषध शोधतांना लागला.

हें पत्र पुणें येथ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.